**05/09/2024**

**To,**
**The Manager**
**Listing & Compliance Department,**
**National Stock Exchange of India Limited Exchange**
Plaza, 5th Floor, Plot No. C/1,
G Block, Bandra-Kurla Complex, Bandra,
Mumbai- 400051.

**(SYMBOL – NITIRAJ ISIN – INE439T01012)**

**Sub.: Submission of Newspaper Cutting of Annual General Meeting (AGM), E-voting & record Date Notice.**

Pursuant to Regulation 30 read with Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, with reference to above subject, please find enclosed newspaper advertisement published in following newspaper on Wednesday, 4th September, 2024 in Apla Maharashtra (Marathi) and on Thursday, 5th September, 2024 in Financial Express (English) both intimating about notice of 25th Annual General Meeting. E-voting information and Record Date for meeting to be held through Video Conferencing/Other Audio Means, for Financial Year 2023-24.

This is for your information and record

**Yours Faithfully,**
**For Nitiraj Engineers Limited**

Deepika Amit Dalmiya
Digitally signed by Deepika Amit Dalmiya
Date: 2024.09.05 16:15:33 +05'30'

**CS Deepika Dalmiya**
Company Secretary &
Compliance officer
M.No. A58029

9:09 100%
Mumbai, Se...
ncialexpress.com
FINANCIAL EXPRESS
5/40



Form No. INC-26
[Pursuant to rule 30 the Companies (Incorporation) Rules, 2014]
**Advertisement to be published in the newspaper for change of registered office of the company from one state to another**
Before the Central Government, Regional Director, Western Region, Mumbai

**Applicant**

For and on behalf of the Applicant
Date : 01.09.2024
Place : Mumbai

**Thirani Projects Limited**

Notice of E-voting Information

**Shree Securities Limited**

Notice of E-voting Information

Form No. INC-26

**motherson**
**MOTHERSON TECHNOLOGY SERVICES LIMITED**
NOTICE OF 39th ANNUAL GENERAL MEETING

**motherson**
**MOTHERSON TECHNOLOGY SERVICES LIMITED**
NOTICE OF 39th ANNUAL GENERAL MEETING

**Shree Securities Limited**
NOTICE FOR BOOK CLOSURE & 31st ANNUAL GENERAL MEETING

Form No. INC-26

E-AUCTION NOTICE
**M/S INDEPENDENT TV LIMITED (IN LIQUIDATION)**
(THE COMPANY)
E-AUCTION

**Thirani Projects Limited**
NOTICE FOR BOOK CLOSURE & 41ST ANNUAL GENERAL MEETING

**PHOENIX**
**NITIRAJ ENGINEERS LIMITED**
Notice of the 29th Annual General Meeting, E-voting and Book Closure

**SOUTH EAST CENTRAL RAILWAY**

**THOMAS SCOTT (INDIA) LIMITED**
NOTICE OF 14th ANNUAL GENERAL MEETING, BOOK CLOSURE AND E-VOTING INFORMATION

**BANG OVERSEAS LIMITED**
NOTICE OF 32nd ANNUAL GENERAL MEETING, BOOK CLOSURE AND E-VOTING INFORMATION

For Advertising in
TENDER PAGES
Contact
JITENDRA PATIL
Mobile No.:
9029012015
Landline No.:
67440215

PHOENIX®
*True way to weigh*

# NITIRAJ ENGINEERS LIMITED

**CIN: L31909MH1999PLC119231**
**Regd. Office: 306 A, Babha Building Marg, Near Police Station, Mumbai –400011 | Website: www.nitiraj.net**
**Email Id: Investor@nitiraj.net | Tel.: +91-2562-239080**

## Notice of the 25th Annual General Meeting, E-voting and Book Closure

Notice is hereby given that the 25thAnnual General Meeting (AGM) of the members of Nitiraj Engineers Limited is schedule to be held on Tuesday, 24th September, 2023 at 12.30 p.m.(IST) through Video Conference (VC)/ Other Audio Visual Means (OAVM), as per provisions of Companies Act, 2013, read with general circular and other circulars issued by the Ministry of Corporate Affairs ("MCA"), and circulars issued by SEBI (referred to as 'SEBI circular") and all other applicable laws, to transact the business matters that will be set forth in the notice of the meeting.

The Annual Report of the Company for the year 2023-24 including the Financial Statement for the year ended March 31,2024 **("Annual Report")** along with Notice of the AGM were sent only by email on Monday, 2nd September, 2023 to all those Members, whose email Addresses are registered with the Company or with their respective Depository Participants **("Depository")** and the Company's Registrar and Transfer Agent, in accordance with the MCA Circulars and the SEBI Circulars.

Pursuant to General Circulars dated 8th April 2020, 13th April 2020, 5th May 2020, 28th September, 2020, 31stDecember 2020, 13th January 2021, 5th May 2022 and 28th December 2022issued by the Ministry of Corporate Affairs (MCA) (referred as MCA Circulars) and SEBI Circulars permitted of the AGM through VC/OAVM without the physical presence of the members at a common venue. In view of the above and the relevant provisions of the Companies Act, 2013 (The Act) and SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulation, 2015 (Listing Regulations) the AGM of the company is being held through VC/OAVM only on Tuesday 24th September, 2024 at 12.30 pm (IST).

Member can join and participate in the AGM through VC/ OAVM facility only. The instructions for joining the AGM and the manner of participation in the remote electronic voting or casting vote through the e-voting system during the AGM are provided in the Notice of the AGM. Member participating through the VC / OAVM facility shall be counted for the purpose of reckoning the quorum under section 103 of the Companies Act2013.

The Annual Report of the Company for the year 2023-24 along with the Notice of AGM Available on the website of the Company, i.e. https://nitiraj.net/annual-reports/ and the website of national Stock Exchange of India Limited. i.e.,www.nseindia.com Members holding shares in physical mode and who have not updated their e-mail addresses with the Company can obtain Notice of the AGM. Annual Report and/or login details for joining the AGM through VC/ OAVM facility including e-voting by sending scanned copy of (a) Copy of the singed request letter mentioning the folio number name and Address of the Member, (b) Self-attested copy of the PAN card and (c) Self-attested copy of any document e.g. (Aadhar, Driving license, Election identity card, Passport) in support of the address of the Member by email to investor@nitiraj.net. Additionally for obtaining login details members may sent above details through email directly at evoting@nsdl.com.

The Company is pleased to provide remote e-voting facility to the members to cast their votes electronically on all the resolutions set forth in the notice convening the said Meeting. The facility of e-voting will also be made available at the AGM and Members attending the AGM through VC/OAVM, who have not cast their vote by remote e-voting, will be able to vote at the AGM. The company has availed the services of NSDL to provide the facility of remote e-voting/ e-voting at the AGM.

Book Closure : Register of members and the Share transfer books of the Company will remain closed from Wednesday, September 18, 2024 to Tuesday, September 24, 2024 (both days inclusive) for the purpose of Annual General Meeting and to ascertain the name of the shareholders entitled to the payment of dividend for the FY 2023-24, if declared at the forthcoming AGM.

The final dividend on equity shares as recommend by Board of Director at their meeting held on 27th May, 2024, subject to provision of section 126 of the Act, if declared at the forthcoming AGM, will be paid/dispatched within 30 days from the date of AGM to eligible members. Dividend will be paid through electronic mode in the bank account registered with RTA. If unable to pay the dividend, due to non-availability of details, company will dispatch dividend warrant.

The remote e-voting period begins on Friday, September 20, 2024 (at 9:00 A.M. IST) and ends on Monday, September 23, 2024 (at 5:00 P.M. IST). During this period shareholders of the Company, holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date Tuesday, September 17, 2024, may cast their vote electronically. The remote e-voting module shall be disabled by NSDL for voting thereafter. The voting rights of Members shall be in proportions of their shares in the paid-up equity share capital of the Company as on the cut-off date i.e., September 17, 2023,

Any person, who acquires shares of the Company and becomes a Member of the Company after sending of the Notice and holding shares as of the cut-off date, may obtain the login ID and password by sending a request at evoting@nsdl.com. However, if he/she is already registered with NSDL for remote E-voting he/she can use his/her existing user ID and password for casting the vote

The details instructions for joining the AGM through VC/OAVM and casting the vote through remote e-voting/e-voting at the AGM is provided in the Notice of AGM. Members are requested to carefully go through the same, Member who need assistance before or during the AGM regarding e-voting facility and/or VC/OAVM facility, can send a request at evoting@nsdl.com

Date : 02/09/2023
Place : Mumbai

For Nitiraj Engineers Limited
**Deepika Dalmiya**
Company Secretary & Compliance Officer

# आपला महाराष्ट्र

## कोंबडा आरवला, तांबडे फुटले

पहाटेच्या वेळी कोंबडा आरवतो आणि तांबडे फुटते. माझ्या आरवण्याने दिवस उगवतो असे काही कोंबड्याला वाटत नाही. मात्र कोंबडा पाळणाऱ्या म्हातारीला तसे वाटते. माझ्याच कोंबड्याच्या आरवण्याने दिवस उगवतो असा तिचा समज असतो. तीच पद्धत सार्वजनिक क्षेत्रात त्यातल्या त्यात राजकीय क्षेत्रात अलीकडे बघायला मिळते. परवा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या अर्थविषयक समितीने अठरा हजार छत्तीस कोटी रुपयांचे बजेट असलेल्या मनमाड इंदूर रेल्वे मार्गास मंजुरी दिल्याची बातमी येऊन धडकली आणि तिच्या श्रेयासाठीची चढाओढ सुरू झाली. अर्थातच ही बातमी सकारात्मक असून महाराष्ट्राचे दोन्ही जिल्हे आणि मध्य प्रदेशातील चार जिल्ह्यांतील जनतेसाठी आनंददायी अशीच म्हणावी लागेल. तसा हा आनंद अनेक वेळा जनतेला झालेला आहे. लालूप्रसाद यादव रेल्वेमंत्री असतानाच्या काळात रेल्वेचे स्वतंत्र बजेट संसदेत मांडण्यात आले होते. तेव्हा त्यांनी या मार्गाच्या मंजुरीची आणि त्यावर टोकन निधीच्या तरतुदीची घोषणा केली होती. तेव्हा वृत्तपत्रांचे रकाने भरले होते. विविध प्रतिक्रिया व्यक्त झाल्या होत्या. अनेक वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहून या मार्गाच्या मंजुरीचे स्वागत केले होते. या रेल्वे मार्गाच्या मागणीत धुळे आणि नाशिक जिल्ह्यातील पत्रकारांचा मोठा सहभाग आहे. वेळोवेळी या मार्गाची मागणी करतानाच त्याचे फायदे सरकारच्या लक्षात आणून देण्याचे काम पत्रकारांनीच केलेले आहे. पत्रकारांनी त्यांचे काम केले. त्याचे श्रेय त्यांना नको आहे. या प्रकल्पाचे श्रेय घेण्याची अहमहमिका राजकीय क्षेत्रातील नेत्यांमध्ये पूर्वीपासूनच लागलेली आहे. तशीच ती आज देखील आहे. मात्र हे श्रेय घेताना जिल्ह्यातील पत्रकारितेचा उल्लेख कोणीच करीत नाही ही बाब दुर्दैवाचीच म्हणावी लागेल. ज्या काळात बोटावर मोजण्या इतकीच वृत्तपत्रे होती, एकही चैनलचा पत्ता नव्हता. त्या काळात म्हणजे अर्ध शतका पूर्वीच्या काळातील वृत्तपत्रांच्या फाइल्स मध्ये अनेक अग्रलेख किंवा लेख, मौजूद आहेत. आज या रेल्वे मार्गाला मंत्रिमंडळाच्या अर्थविषयक समितीने मंजुरी दिली असली तरी त्यावर प्रत्यक्ष आर्थिक तरतूद केलेली नाही. फक्त त्याच्या खर्चाच्या बजेटचा उल्लेख केलेला आहे. प्रथमच सरकारच्या वतीने या रेल्वे मार्गाचे फायदे उधृत करण्यात आलेले आहेत. अन्यथा गेल्या पन्नास वर्षांपासून हा मार्ग व्यवहार्य नाही त्यामुळे होऊ शकत नाही असेच सरकारकडून सांगण्यात येत होते. मग सरकार कुठल्याही पक्षाचे असो. अगदी अटल बिहारी वाजपेयी, व्ही.पी. सिंग पंतप्रधान असतानाच्या काळात देखील अशीच कारणे नमूद करण्यात आलेली होती. आता मात्र सरकारला हा मार्ग थेट संपर्कासाठी सुविधा प्रदान करणारा आणि वाहतुकीला गतिशीलता आणणारा वाटतो. याबद्दल सरकारचे अभिनंदनच केले पाहिजे. गतिशक्ती मास्टर प्लॅन असो की अजून काही असो हा प्रकल्प मंजुर झाला हे महत्वाचे आहे.

दिल्लीहून मुंबईला जाण्यासाठी, सध्या दोन मार्ग उपलब्ध आहेत. एक कोटा रतलाम सूरत मार्गे उपलब्ध असून दुसरा भोपाळ, इटारसी, भुसावळ, मनमाड मुंबई असा आहे. हे दोन्ही मार्ग वेळखाऊ आहेत. त्या तुलनेत दिल्ली, भोपाळ, उज्जैन इंदोर धुळे मनमाड मुंबई असा मार्ग अधिक सोयीचा राहील आणि त्याचे महत्व वेळोवेळी राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी, जन चळवळींनी तसेच मीडियाने वेळोवेळी अधोरेखित केलेले आहे. परंतु हा मार्ग तोट्याचा असल्याचे कारण देत नाकारला जात होता. मंजूर होऊनही तो रद्द झाला होता हे विशेष म्हणावे लागेल. याचे आणखी एक कारण म्हणजे मुंबई आग्रा महामार्गावरील ट्रक वाहतुकीची लॉबी फार मोठी असून ती अडचणी निर्माण करीत होती. रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी यातून मार्ग काढला होता. जेएनपीटी बंदर विकसित करण्याचा एक भाग म्हणून हा रेल्वेमार्ग त्या खात्याकडून पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली होती. पण तिथेही माशी शिंकली. परिणामी हा रेल्वे मार्ग होणार नाही अशीच लोकांची धारणा झाली होती. मात्र गेल्या दहा वर्षाच्या काळात डॉ. सुभाष भामरे खासदार असताना त्यांनी या मार्गासाठी सातत्याने प्रयत्न केले हे नाकारून चालणार नाही. त्यापैकी बोरविहीर नरडाणा या रेल्वे मार्गासाठी ७०० कोटी रुपयांची तरतूद करून आणण्यास त्यांना यश मिळाले. या मार्गासाठीच्या भूसंपादनाचे काम सध्या सुरू आहे. तेव्हा त्यांनी या मार्गाच्या मंजुरीचे श्रेय घेण्यात काही गैर नाही. या मार्गाचे वैशिष्ट्य म्हणजे रेल्वे मार्गाच्या संपर्कात नसलेला मालेगाव तालुका, शिरपूर तालुका, खरगोन जिल्हा, धामनोद आदी जिल्ह्ये आणि तालुके रेल्वे मार्गाच्या कक्षेत नव्हते. आता ते येणार आहेत. त्यामुळे मध्य प्रदेशातील शेती उत्पादक घटकांना त्याचा अधिक फायदा होईल. शिवाय दिल्लीकडून येणारी खनिजे, किंवा इतर माल, इंदूर मार्गे मुंबईला नेता येईल, दक्षिणेतही पाठविता येईल. अहमदाबादहून दक्षिणेकडे मनमाड मार्गे होणारी वाहतूक नरडाणा धुळे मनमाड या मार्गामुळे सुलभ होणार आहे. त्यासाठी जळगाव पाचोरा चाळीसगाव असे फिरून येण्याचे टळेल. त्यामुळे वेळ आणि इंधनही वाचेल. मध्यप्रदेशात पर्यटनासाठी मोठा वाव आहे. मांडू, ओंकारेश्वर, महेश्वर, उज्जैन, अशी महत्त्वाची स्थळे असल्याने पर्यटनाचा विकास होईल. विशेष म्हणजे रस्त्याने ट्रक वाहतूक न करता गोव्यातून ज्या पद्धतीचा प्रयोग चालू आहे त्यानुसार रेल्वे द्वारा ट्रकांची वाहतूक बंदरांपर्यंत करता येऊ शकेल.

या रेल्वे मार्गाचे श्रेय तसे अनेकांचे आहे. १९८० च्या दशकात खंडेराव बाजार रेल्वे संघर्ष समितीची स्थापना झाली. या समितीने बराच काळ मनमाड इंदूर रेल्वे मार्गाचा पाठपुरावा केला. कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने ज्या ज्या वेळी खानदेशात रेल्वे परिषदेचे अध्यक्ष आणि कम्युनिस्ट पक्षाचे खासदार आले तेव्हा तेव्हा त्यांनी या रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी आपण प्रयत्न करू असे सांगितले आणि त्यानुसार त्यांनी तसे प्रयत्न केले. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान लोकसंग्राम पक्षाने हा प्रश्न हाताळला. तो चर्चेत आणला, त्यासाठी रस्ता रोको आंदोलन केले आणि एक शिष्ट मंडळ दिल्लीला नेले. माणिकराव गावित यांनी खासदारकीच्या काळात जळगाव सुरत रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण आणि विद्युतीकरण यासाठी जे प्रयत्न केले आणि तो प्रकल्प मंजूर करून घेतला. त्याबरोबरच त्यांनी मनमाड इंदोर रेल्वे मार्गासाठी देखील पत्रव्यवहार केला. संसदेत प्रश्न विचारले. राजवर्धन कदमबांडे आमदार असताना त्यांनी अनेक वेळा मुख्यमंत्र्यांशी, आणि केंद्रातील रेल्वे मंत्र्यांशी बराच पत्रव्यवहार केलेला आहे. शिवाय वेळोवेळी मंत्र्यांच्या भेटीही घेतलेल्या आहेत. रोहिदास दाजी पाटील मंत्रिमंडळात असताना आणि त्यानंतर कुणाल पाटील यांनी आमदार या नात्याने या रेल्वेमार्गासंबंधीचा पत्रव्यवहार केलेला आहे. विद्यमान खासदार डॉक्टर शोभाताई बच्छाव यांनी जून महिन्यात बजेट अधिवेशनात या रेल्वे मार्गाची मागणी केली आणि तसे निवेदन रेल्वेमंत्र्यांना दिले. ती मागणी मान्य झाल्यामुळे त्यांचा या मागणीतील सहभाग नाकारता येणार नाही. महाराष्ट्र सरकारने विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना या मार्गाच्या खर्चाचा निम्मे वाटा उचलण्याचा निर्णय मंत्रिमंडळात घेतला होता. पण मध्य प्रदेशाने पुढाकार घेतला नव्हता म्हणून हे काम पुढे सरकले नाही. अशाप्रकारे एकूणच गेल्या पन्नास वर्षातील या रेल्वे मार्गाच्या मागणीचा इतिहास आहे. या रेल्वे मार्गाच्या मागणीचा चावून चोथा झाल्यामुळे जनमानसात त्याच्या मंजुरीबद्दल मोठ्या प्रमाणावर आनंदाचे भरते आले असे काही म्हणता येणार नाही. तरीही मंजुरीची बातमी निश्चितच सकारात्मक म्हणावी लागेल.



## नंदुरबार महसूल पतसंस्था चेअरमनपदी हिरालाल गुले यांची बिनविरोध निवड

**नंदुरबार, दि.३ (प्रतिनिधी)- धुळे व नंदुरबार महसूल कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी हिरालाल गुले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यानिमित्त सर्व संचालक मंडळ व कर्मचारी यांनी सत्कार केला.**

सहकारी संस्थांचे उपनिबंधक आणि अध्यासी अधिकारी राजेंद्र विरकर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. सभापती पदासाठी हिरालाल रामचंद्र गुले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे विरकर यांनी जाहीर केले. याप्रसंगी महसूल कर्मचारी पतसंस्थेचे संचालक महारु पाटील, संजय शिंदे, श्रीकांत देसले, उत्तम वाघ, लोटन धनगर, रवींद्र कानडे, सच्चीदानंद वळवी, संतोष जोशी, सुभाष बाविस्कर, बसंती पाडवी, माया बिऱ्हाडे तसेच पतसंस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

## कायदा सुव्यवस्था टिकविण्यासाठी ग्रामस्थांचे सहकार्य आवश्यक; सपोनि मयुर भामरेंचे आवाहन



**पिंपळनेर, दि.३- कायदा सुव्यवस्था टिकवण्यासाठी ग्रामस्थांचे सहकार्य देखील तेवढेच महत्वाचे आहे, असे प्रतिपादन निजामपूर पोलीस ठाण्याचे सपोनि मयुर भामरे यांनी केले.**

जैताणे येथील ग्रामसभेत विविध विकास कामांवर चर्चा झाली. याप्रसंगी सपोनी मयुर भामरे यांनी ग्रामस्थांना वाढती गुन्हेगारी, कायदा सुव्यवस्थेविषयी माहिती दिली. गावात चोरीवर आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे चौकाचौकात बसवावे. संशयित व्यक्ती दिसल्यास पोलिसांना कळवणे तसेच परिसरात बोगस खत, बियाण्याचे जाळे पसरले आहे. ती आपण मोडीत काढूच परंतू शेतकरी बांधवांनी देखील बी बियाणे, खतांविषयी माहिती घेवून, खात्री करूनच ते खरेदी करावे, असे आवाहन केले. गावातील तरुणांनी स्पर्धा परीक्षेसह शारीरीक फिटनेसकडे लक्ष द्यावे. कोणी संकटाच असल्यास डायल ११२ मदत मागू शकतो.विद्यार्थी व मुलींना कोणी त्रास देत असेल तर पोलिसांशी संपर्क साधावा. तुम्ही देखील सक्षम व्हावे,असे आवाहन यावेळी भामरे यांनी केले. यावेळी सरपंच कविता मुंजगे, उपसरपंच बाजीराव पगारे, ग्रा.पं.सदस्य राजेश बागूल,पोपट न्याहाळदे, गणेश न्याहाळदे, मनियार सत्तार, समाधान महाले, राकेश शेवाळे, नंदकुमार जाधव, ग्रामसेवक अनिल राठोड, लिपीक यादव भदाणे, डॉ.गावित, कृषी विभागाचे अधिकारी, ग्रामपालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## धुळ्यात श्री संत सेनाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त मिरवणूक

**धुळे, दि.३- नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेनाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने धुळे शहर नाभिक समाजाच्या वतीने सेनाजी महाराज पालखी मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.**



धुळे शहर नाभिक दुकानदार संघटना तसेच धुळे शहर नाभिक विकास संस्था व समस्त नाभिक समाज धुळे यांच्यावतीने शुक्रवार दि.३० ऑगष्ट रोजी संत सनाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त सालाबादप्रमाणे सकाळी ८:३० वाजता केशव गार्डन, छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या समोर सेनाजीच्या पालखीचे पुजन प्रमिलाबाई त्र्यंबकराव सैंदाणे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच रथावरील सेनाजींच्या प्रतिमेचे पूजन राहुल अशोक सुर्यवंशी अध्यक्ष धुळे शहर नाभिक दुकानदार संघटना व विशाल वासुदेव चित्ते देव-पूर अध्यक्ष यांनी केले. सदर मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून जुना आग्रा रोडमार्गे, पाचकंदील, कराचीवाला खुंट, महात्मागांधी पुतळ्यामार्गे मोठ्या पुलावरून एकविरा माता मंदिरासमोरील कानुश्री मंगल कार्यालय येथे नेण्यात आली. कानुश्री मंगल कार्यालय येथे संत सेनाजी महाराजांचे पूजन करून महाआरती अनिल मधुकर बोरुडे, संजय काशिनाथ अहिरराव, विशाल वासुदेव चित्ते यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन प्रकाश जाधव, भगवान चित्ते व सुनील सैंदाणे यांनी केले तर या दिवशी धुळे शहरातील सर्व दुकानदार बांधवांनी आपापली दुकाने बंद ठेवले होते. या प्रसंगी विलास सैंदाणे, युवराज वारुळे, राजेश महाले, राहुल सुर्यवंशी, संजय अहिरराव, अमृत महाले, आबा सैंदाणे, दत्तात्रय सैंदाणे, बापूजी अहिरे, सुभाष शिरसाठ, जितेंद्र पगारे, सुनिल सैंदाणे व समाजबांधव उपस्थित होते.


**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS
**AHIRRAO MINABAI DAULAT**
MY NEW NAME IS
**MEENA DIPCHAND SALUNKHE**
ADD- 16B, SAMRUDDHA NAGAR, WALWADI, DHULE.(M.S.)


## श्री चक्रधर स्वामी यांच्या सुवर्ण महोत्सव अवतार दिनानिमित्त उद्या शहाद्यात विविध कार्यक्रम

**शहादा, दि.३ (प्रतिनिधी)- येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवार दि.५ सप्टेंबर रोजी महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा सुवर्ण महोत्सव अवतार दिनानिमित्त विविध कार्यक्रम होणार आहे. यावेळी जाधववाडी (जि.पुणे) येथील आचार्यप्रवर प. पू. श्रीमोठे बाबाजी अंकुळनेरकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या महोत्सवात प्रतिष्ठित थोर आचार्य गण, संत, महंत, तपस्वीनी, पंचक्रोशीतील साधू संत आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आ-हेत. दरम्यान सर्वज्ञांचा अवतार दिन महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.**

मराठी भाषेला समृद्ध करणारा संप्रदाय म्हणून महानुभाव संप्रदायाची ओळख असून, या संप्रदायाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन साजरा करण्यासाठी शहादा तालुक्यातील भक्तांना पूर्वजांनी वारसा स्वरूपात दिलेली धर्मसेवा परंपरा यावर्षी ५० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्या अनुषंगानेच हा सुवर्ण महोत्सव चक्रधर स्वामी अवतार दिन शहादा येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात साजरा होणार आहे. जय श्रीकृष्ण महानुभाव परिषद, शहादा (धुळे व नंदुरबार जिल्हा) या संस्थेतर्गत ४९ वर्षांपासून सर्वांनी श्री चक्रधर प्रभूंच्या अवतार दिन महोत्सव संपन्न होत आहे. यंदा सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. यावेळी समशेरपूर येथील श्रीकृष्ण मंदिराचे संस्थापक सुनीलदादा भोजने यांचा मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. यावेळी धर्मसभा उद्घाटन प.पू.महंत श्री भास्कर बाबाजी महानुभाव (शहादा), धर्मकार्य अभिष्टचिंतक आचार्य प्रवर श्रीपातूरकर बाबाजी (प्रभूदत्त नगर), कार्यक्रमाला विशेष अभ्यागत प.महंत श्री अशनाख्य बाबाजी महानुभाव (सेलू), प.महंत श्रीमानेकर दादाजी महानुभाव (कनाशी), तसेच संत, महंत, समाजसेवक, राजपत्रित अधिकारी यांची उपस्थित राहणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ४ सप्टेंबर ला बुधवारी शहादा शहरातून दुपारी एक वाजता सर्वज्ञ संदेश रथोत्सव शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. शोभायात्रेला संत, महंतांचा उपस्थितीत दुपारी १ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीतून प्रारंभ होईल. स्टेट बँक, बस स्थानक, नगरपालिका मार्गे पुन्हा कृषी उत्पन्न बाजार समितीत शोभायात्रेच्या समारोप होणार आहे. यात सर्वज्ञोपासक भक्त मंडळी सहभागी होतील. दि.५ सप्टेंबर अवतार दिनी सकाळी पाच वाजेपासून विविध धार्मिक कार्यक्रम व धर्मसभा होऊन उपहार विधी, महाप्रसाद होणार आहे.

या कार्यक्रम संदर्भात शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजित पाटील यांनी सांगितले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात होणाऱ्या श्री चक्रधर प्रभूंच्या अवतार दिन महोत्सव कार्यक्रमासाठी आलेले संत, महंत, सद भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक त्या उपाययोजना व सहकार्य करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला उपस्थितिचे आवाहन निमंत्रक जय श्रीकृष्ण महानुभाव परिषद ट्रस्ट शहादा, म.सुनील दादा भोजने (समशेरपुर) तसेच आयोजक सर्वज्ञोपासक सद्भक्त नंदुरबार व धुळे जिल्हा यांनी केले आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, शेतजमीन मौजे अनकवाडी ता. जि. धुळे येथील धुळे म. न. पा. हद्दीबाहेरील गट क्र. ९९/२/ब चे एकूण लावणी लायक क्षेत्र २ हेक्टर ०० आर. पोट खराब क्षेत्र ० हेक्टर ० आर. असे एकूण क्षेत्र २ हेक्टर ०० आर आकार ०३ रुपये ३१ पैसे.

यास लागू चतु:सिमा
पुर्वेस : गट नं. ९९/ब/१
पश्चिमेस : गट नं. ९९/अ/२/१
दक्षिणेस : गट नं. ९९/अ/१
उत्तरेस : गट नं. ९९/अ/३

येणे प्रमाणे चतु:सिमाच्या वर्णनाच्या आतील शेतजमीन उताऱ्यावरील मालक जालिंदर हिरामण गर्दे रा. मु. पो. आर्वी ता.जि. धुळे –४२४००६ यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील शेतजमीन असून त्यांनी सदरहू शेतजमीन कायमस्वरूपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे. व बयाण्याची रक्कम ही स्विकारली आहे.

आमचे आशिलांना सदर शेतजमीन खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर शेतजमीनीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, वि. का. से. सोसा. व इतर बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण,टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर शेतजमीनीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर शेतजमीन संबंधित मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरूपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची शेतजमीन निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे आशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण : धुळे दिनांक ०३/०९/२०२४

**ॲड. चेतन महादु यादव**
सि. स. नं. २५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे –४२४००१
मो.नं.९६८९१२४६९२


## अंतुर्ली येथे पोळा उत्साहात साजरा

शिरपूर, दि.३- तालुक्यातील नवे अंतुर्ली गावात पोळ्याचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी पावसाच्या वेळोवेळी होणाऱ्या आगमनामुळे पिके छान बहरली आहेत. त्यामुळे शेतकरी आनंदात आहेत. वर्षातून एकदा येणारा बैलांचा सण पोळा सर्वांनी उत्साहात साजरा केला. शेतकऱ्यांनी बैलांची आंघोळ करून, त्यांना सजवून, संपूर्ण गावातून मिरवणूक काढली. तद्नंतर घरी बाजेवर औताचे साहित्य ठेवून, बैलांची आरती केली. त्यांना गोडधोड खाऊ घातले. शिरपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रा.पी.एस. अंतुर्लीकर व सौ.लिलाबाई अंतुर्लीकर यांनीही अंतुर्ली येथे बैलांची पूजा करून पोळ्याचा सण साजरा केला.




रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान


**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS
**SALUNKE DIPCHAND LAXMN**
MY NEW NAME IS
**SALUNKHE DIPCHAND LAXMAN**
ADD- AT POST SHEWALI TAL-SAKRI, DIST.DHULE.(M.S.)


### शब्दकोडे क्रमांक.१९९८



**आडवे शब्द :** १.नसरूददीन शहा,चंकी पांडे,सनी देओल यांचा एक सिनेमा ३.तेजाब-सिनेमातील एक सह अभिनेत्री ६.वहीचे पान बनवण्यासाठी वापरतात ८.प्रजा ९.हिंदीत-कर १०.साल १३.हिंदीत-मीठ १५.वारा १६.ठळक,उठावदार १८.वंदन १९.काळया रंगाचा सुगंधीत खनिज वा दगड २१.पायताण २२.विनयशील २३.सहवास,अस्तित्वाची जाणीव २४.तागडी,तराजू ,श्रावणबाळाने माता-पित्याला तीर्थयात्रेस ज्यातून नेले ते साधन २७.तो पर्यंत २८.वडीलांस आपण आदराने हाक मारतो ३०.हुशार ३३.त्रिदोषांपैकी एक ३५.हालचाल ३७.वधू-वराच्या लग्नाची मिरवणूक ३९.विविध तऱ्हा,प्रकार ४१.हिंदीत-सावली ४२.धडा ४३.चुलता ४५.अधिकार ४८.वाईट इच्छा ४९.शेत ५०.साद **उभे शब्द :** १.यश २.कुत्रा ३.विचार ४.बारीक जीवएलहान आकाराच्या अळया वा पतंग ५.पाणी ६.समय ७.विनोद खन्ना,फिरोज खान यांचा एक सिनेमा ११.शाळेत शिक्षक ज्यावर लिहीतात ती काळया रंगाची वस्तू १२.हरणाचे बाळ १४.मौज १५.आक्रमण करणारा १६.खूप वेगात असलेला १७.सुधा २०.सोने २३.धुळीचे गोलाकार वादळ २४.नदीचा किनार २५.करंटा २६.धनी २९.पोक ३१.आरोप ३२.पवन ३४.आमीर खान,काजोल यांचा एक सिनेमा ३५.स्चकर ३६.उपवासाच्या दिवशी फराळाला वापरतात तो तांदूळ ३७.विष्णूचा एक अवतार ३८.शोध ४०.चौक ४४.उत्तर प्रदेशातील एक तीर्थस्थळ ४६.दु:ख ४८.इंग्रजी वर्णमालेतील अकरावे वण

### शब्दकोडे क्रमांक.१९९७ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुं | ब | ई | | पा | प | ड | | अ | | खा | स |
| गी | | जा | ग | र | ण | | दि | व | स | | म |
| | वै | र | ण | | ती | ट | | स | | वि | ज |
| सं | त | | ती | न | | क | ष्ट | | मे | ष | |
| धी | र | ज | | ग | म | ला | | खु | ळा | | पा |
| | णा | | बा | र | का | | ना | ला | | मा | ग |
| के | | ना | व | | न | र | क | | ध | व | ल |
| व | जा | | टा | का | | ण | | मा | | स | खा |
| डा | | क | | ढा | का | | ह | मा | ल | | ना |
| | स | ला | म | | न | व | मी | | ढा | ल | |
| र | | वं | द | न | | री | | न | ऊ | | मे |
| | स | त | त | | आ | स | पा | स | | ब | घ |

## खड्ड्यांमधून मिरवणुका?

धुळे- गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसावर येवून ठेपलेला असतांना शहरातील प्रमुख मार्गांवरील खड्डे जैसे थे असल्याने गणेशभक्तांमध्ये संताप व्यक्त होत आहे. खड्ड्यांमधून गणेश मिरवणूक घेवून जायच्यात का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.


प्रकाश में आज शुटआटऊट लोखंडवाला




MANOHAR CHITRA MANDIR, DHULE ता . 15 से




बिग सिनेमास मनोहर नाट्य चित्रमंदिरः आग्रा रोड धुळे

| Stree 2 (U/A) | 12:15,3:15,6:15 & 9:15 pm | | | |
|---|---|---|---|---|
| Ticket | बाल्कनी | प्लेटिनियम | गोल्ड | सिल्वर |
| Ticket Rate | ₹150 | ₹112 | ₹100 | ₹100 |

www.facebook.com/ManoharBigCinemasIndia
8007232021 232021/233421
Book my Show Paytm

BOOKING OPENS
ज्योती सिनेमा 3D JYOTI 2K CHRISTIE DOLBY DIGITAL



ता.३० रोज ४ खेल टा, १२,३,६,९बजे (४खेल में) स्त्री २ (हिंदी में)

| तिकीट दर | गोल्ड | सिल्वर | बाल्कनी |
|---|---|---|---|
| | ८० रु. | ८० रु. | १३० रु |

ONLINE TICKET BOOKING OPEN
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

